# टीजेएस्बी सहकारी बँक लि.

**(मल्टि-स्टेट शेडयुल्ड बँक)**

(रजि.क्र.: एम्एस्सीएस्/सीआर/२८७/२००८ दि.२३.१०.२००८)

## सभासदांस वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार दिनांक १ जून, २०२५ रोजी, सकाळी १० वाजता, रेमण्ड लि. - कन्व्हेन्शन सेंटर एलिगंझा हॉल, पोखरण रोड क्र.१, समता नगर, ठाणे - ४०० ६०६ येथे आयोजित करण्यात आली आहे.

## सभेपुढील विषय

१. दि. २ जून, २०२४ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१ मार्च, २०२५ अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व नफा वाटणी मंजूर करणे आणि वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठीच्या लाभांशास मान्यता देणे.

४. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करण्याचा व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास देणे.

५. धर्मादाय / सार्वजनिक संस्थांना अंशदान निधीतून देणगी देणेबाबत प्रस्तावास मान्यता देणे.

६. हया वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

७. माननीय अध्यक्षांच्या संमतीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**नोंदणीकृत कार्यालय :**

**टीजेएस्बी सहकारी बँक लि.**

टीजेएस्बी हाऊस, प्लॉट नं. बी-५, रोड नं. २,
वागळे इन्डस्ट्रीअल इस्टेट, ठाणे (प) - ४०० ६०४
दिनांक : १७/०५/२०२५

**संचालक मंडळाच्या आदेशावरुन**

sd/-

**नि. नं. आरेकर**
व्यवस्थापकीय संचालक व
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :** सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत जर गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी, सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी घेतली जाईल. या स्थगित सभेस गणपूर्तीची व वेगळया सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

## सभासदांस महत्वाच्या सूचना

१. सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न / सूचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी त्या २२ मे, २०२५ पर्यंत कामकाजाच्या वेळेत, नोंदणीकृत कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात.

२. सभासदांना नांव / पत्ता बदलायचा असल्यास त्याची बँकेच्या नोंदणीकृत कार्यालयातील शेअर्स विभागात नोंद करुन घ्यावी.

३. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल, बँकेचे संकेतस्थळ www.tjsbbank.co.in वर उपलब्ध आहे किंवा खाली दिलेला QR कोड स्कॅन करून डाऊनलोड करता येईल. तसेच वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमध्ये आणि नोंदणीकृत कार्यालयात उपलब्ध आहे.

४. उपस्थित सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी येताना सभासदत्वाचे ओळखपत्र अथवा फोटोसहित ओळखपत्र आणणे अत्यावश्यक आहे. कृपया उपस्थिती प्रमाणपत्र सभेच्या ठिकाणी उपस्थिती रजिस्टर मध्ये स्वाक्षरी केल्यावर ताब्यात घ्यावे.

५. वैयक्तिक सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस वैयक्तिकरित्या उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कुलमुखत्यारपत्र अथवा अशा कोणत्याही प्रकारच्या अधिकार पत्राद्वारे नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मार्फत उपस्थिती लावता येणार नाही.